Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# छत्रपती शिवाजी महाराजांची जमीन महसुल व्यवस्था

डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार
M.A., M.Ed, NET, SET, Ph.D.(Hist.)
रा. वसमत जि. हिंगोली

## प्रस्तावना

रयत सुखी, राजा सुखी, शेतकरी सुखी तर राजा सुखी हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यकारभाराचे प्रधान सुत्र होते. स्वराज्य शेतकरी, कष्करी रयतेच्या कल्याणासाठी असावे ही त्यांची एक भावना होती. असे अनेक आज्ञापत्रतातुन व्यक्त झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे समस्त देशवासीयांचे प्रेरणास्थान आहे. शिवरायांच्या चरित्रातुन अनेक विविध कामामध्ये स्फुर्ती मिळाली आहे. शिवरायांनी आपल्या स्वराज्यात संपुर्ण आयुष्यात इतक्या विविध क्षेत्रात मुलभुत काम केले की आज ही त्या कामांची माहिती घेतली तरी मन थक्क होते. स्वराज्यातील एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणाऱ्यांच्या नावे लावुन तिची नोंद महालकऱ्याच्या दप्तरी असे. तोडरमल आणि मलिक अंबर यांनी घालुन दिलेल्या जमिन महसुल आकारणी पद्धतीवरच शिवाजी महाराजांची महसुल आकारण्याची पद्धत आधारित होती या पद्धतीत काळानुसार फेरफार करण्यात आले होते. त्याच्या जमिन महसुल पद्धतीचा अभ्यासात लक्षत येतू की, ते एक कुशल संघटक व कुशल नियोजनकार होते. शिवपुर्वकाळातील परिस्थितीचा आढावा घेतला तर शेती व शेतकऱ्याच्या जीवनावर अनेक संकटाशी सामना केलेला दिसुन येतो. त्यात पावसाची अनिश्चिता, दृष्काळ, सिंचन सुविधाचा अभाव, युद्धाचे प्रसंग अशी अनेक कारणे होती.

## विषय निवडणेचा हेतु

प्रस्तुत विषय निवडणेचा हेतु म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज याच्या तात्कालीन परिस्थिती जमिन महसुल पद्धती अभ्यास करणे.

## गृहितके

१) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कृषी धोरणाचे अध्ययन करणे.
२) छत्रपती महाराज यांच्या जमिन महसुल व्यवस्थेचा करणे.
३) छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्यातील शेतकऱ्याप्रति असलेले शेतविषयक धोरण जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी इतिहास विषयातील प्रचलित संशोधन पद्धती पैकी संदर्भ पद्धती या वापर करण्यात आला असुन संशोधन पद्धतीत संदर्भ साधनांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्याकरिता प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**जमिन महसुल व्यवस्था**

महाराष्ट्र हा सुपिक भुप्रदेशानी व्यापलेला आहे. महाराष्ट्रातील जमिनी डोंगराळ, गवताळ व काळया मातीच्या सपाट जमिनी, असा तीन प्रकारात विभागलेल्या असल्यामुळे त्यांचे वर्गीकरण उत्तम, मध्यम, व कनिष्ठ अशा तीन प्रकारात करण्यात येत असे.

**१) जमिन महसुल आकारणीची पद्धत.**

शिवकाळात जमीन महसुल आकारणीच्या नागर पद्धती, क्षेत्र पद्धत, व बटाई पद्धत अशा तीन पद्धती प्रचलित होत्या, डोंगर भागात नांगर पद्धत वापरली जात असे,जमिनीचा विशिष्ट तुकडा नागरण्यास आवश्यक असलेल्या नागरांच्या संख्येवरुन महसुल आकारणी केल्या जात असे ही महसुल आकारणी करताना जमिनीचे उत्पन्न प्रकार लक्षात घेतला जात नसे.'[१] क्षेत्र पद्धतीमध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी प्रत्यक्षात मोजल्या जात असत. '[२] बटाई पद्धतीमध्ये जमिनीतील पिकाच्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन त्या पिकाचा अर्धा हिस्सा जमिनमहसुल म्हणुन निश्चित केल्या जात असे. '[३]

**२) महसुल विभाग**

'सभासद बखरकार म्हणतो की, इ.स १६७३ मध्ये पन्हाळा जिंकल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात तीन भाग केले या भागावर एका-एक सरकारकुन किंवा सुभेदार यांची नेमणुक केली. '[४] छत्रपती शिवाजी राजे यांनी उत्तर विभाग, दक्षिण विभाग, दक्षिण पुर्व विभाग असे प्रमुख विभाग केले. या तिन्ही विभागांचे पुन्हा सुभा, परगणा, तर्फ, महल, तपे असे विभाग केली. महसुल हे शिवाजी राजे यांच्या स्वराज्याचे उत्पन्नाचे साधन होते. महसुल निश्चितीसाठी विभाग केले साधारण ११ लाख ते ३ लाख होन महसुल जमा होईल इतक्या प्रदेशाचा समावेश होता. "[५]

**३) जमिनीची मोजणी**

'चिटणीस बखरीत वर नमुद केल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीत स्वराज्यातील जमिनीची तीन वेळा मोजणी झाली होती. पहिली मोजणी दादोजी कोंडदेवाने, दुसरी मोजणी

मोरोपंत पिंगळे व तिसरी मोजणी अण्णोजी दत्ता यांनी केली.'[६] 'जमिन मोजणीसाठी पाच हात लांब व पाच मुठी लांबीची काठी वापरण्यात आली त्याला (शिवकाठी) म्हणुन ओळखले जात असे. जमिनीची प्रतवारी ठरवुन त्या जमिनीतील उत्पन्न पिकांचा अंदाज घेवुन महसुल कर ठरविला जात होता. '[७] ही शिवकाठी पाच हात व पाच मुठ लांबीची असे. ४०० चौरस काठ्याचा एक बिघा होत असे. शिवकाळात जमिनीचे अव्वल, दम वाजेट असे प्रकार सांगितले आहे. ही उत्पन्न क्षमतेनुसार त्यांचे विभाजन केले गेले आहे.

### ४) महसुल अधिकाऱ्याच्या नेमणुका

१. सरकारकुन

शिवाजी महारांजांच्या काळात जमीन महसुल हाच महसुलचा मुख्य आधार होता शिवाजी महाराजांनी प्रजा जणांचा हिताचा विचार करुन शेतसारा धोरण आखताना दिसले आहे सरकारकुन हा प्रांताचा प्रमुख महसुल अधिकारी होता. तो प्रांताचा राजा प्रतिनीधी म्हणुन काम करीत असे. 'रामचंद्र आमात्य आपल्या 'आज्ञापत्रात' म्हणतात. सरकारकुन हा उच्चकुलीन घराण्यातील असावा सरकारकुन मुख्य कार्य म्हणजे प्रांताचा सर्व वार्षिक जमिन-महसुलाचा हिशोब सरकारला सादर करणे हे होते. सभासद बखरकार म्हणतो. 'शिवकाळात त्याच्या अष्टप्रधानातील तीन प्रधानाकडे त्याच्या खात्याच्या कारभार शिवाय हे सरकारकुन काम सोपविलेले होते. '[८]

२. सुभेदार - सुभेदार हा सभा विभागाचा महसुल अधिकरी होता त्याच्या मदतीला हिशेबनीस म्हणुन मुजुमदार व काही कारकुन असत.

३. मुजुमदार - मुजुमदार हा बुद्धिमान जिज्ञासु व हिशोबात निष्णात असा स्वत: राजे छत्रपती शिवाजी महाराज त्यांची निवड करत.

४. हवालदार - हवालदार हा महालाचा महसुल अधिकारी होता. देशमुख व देशपांडे हे जमिन-महसुल वसुल करण्याच्या कामात हवालदाराला मदत करीत असत.

५. पाटील - खेडेगावातील जमिन-महसुल गोळा करण्याचे काम खेड्यातील पाटलाकडे असे.

### शिवकालीन कृषी व्यवसायावरील कर

'१७ व्या शतकात व त्यानंतरच्या कालखंडात राज्याचे उत्पन्न विविध कराची आकारणी करुन मिळविले जात असे. महाराष्ट्रितिहासाची साधने या ग्रंथात डॉ. वा. सी. बेंद्रे यांनी अनेक मेस्तकांचा उल्लेख केला आहे मेस्तक म्हणजे आर्थिक व्यवहाराचे हिशोब कसे ठेवावेत. यांची मार्गदर्शन पुस्तिका.

a. जकात: मालाची वाहतुक व उत्पादनावरील कर
b. जिराईत: जिराईत जमिनीवरील मिळणारे उत्पन्न
c. बागाईत: बागाईत जमिनीवरील मिळणारे उत्पन्न

d. बारनगजग: आंब्याच्या बागेपासुन मिळणारे उत्पन्न
e. बारगुजानन: वेली पासुन होणारे उत्पन्न
f. बादस्ती: झाडापासुन मिळणारे उत्पन्न
g. कटुबाग: पडजमिनीपासुन येणारे उत्पनन. '९

## निष्कर्ष

शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेतीव्यवसायशी संपुर्णपणे निगडित झाले होते. उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी हे सुभाषित प्रसिद्धीस आहे शिवकालीन महाराष्ट्रात खेड्याचा समावेश होता. खेडी ही स्वयंपुर्ण होती खेड्यातील सर्व व्यवहार खेड्यामध्ये चालत असतं शेती हा अर्थव्यवस्थेचे मुख्य साधन होते. सतराव्या शतकात शेती अर्थकारणाचा पाया होता त्यामुळे शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना वेगवेगळया मार्गाने मदत केला त्याच्या या भुमिकेमुळे शिवाजी महाराजांनी शेतकऱ्याविषयीची भुमिका पुत्रासारखी होती त्यामुळे शिवाजी महाराजांचा शिवकाळ म्हणजे भारताच्या इतिहारात सुवर्णकाळ होता आज्ञापत्रात म्हटले आहे कि, खजिना म्हणजे राज्याचे जीवन. स्वराज्यातील सारा निश्चिती करण्यासाठी शिवाजी महाराजांनी सर्वकष विचार करुन जमिन महसुल धोरण ठरविले. ग्रॅट डफनेही शिवाजी महाराजाच्या महसुल प्रणालीची श्रेष्ठता मान्य केलेली आहे.

## संदर्भ

१) डॉ. धनंजय आचार्य (२००७) मराठा सनेचा उद्य श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, पु. २५१
२) कित्ता, पु. २५१
३) कित्ता, पु. २५१
४) प्रा. बी.एस. सावंत (१९९७), मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपुर, पु. १९२
५) कित्ता, पु. १९२
६) डॉ. धनंजय आचार्य (२००७) मराठा सतेचा उद्य, साईनाथ प्रकाशन, नागपुर, पु. २५१
७) Historicity Research Journal. बळीराजाचे कैवारी-छत्रपती शिवाजी महाराज Vol-2, June 2006, पु. २
८) प्रा. बी. एस. सावंत (१९९७), मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपुर, पु. १९२
९) Historicity Research Journal, बळीराजाचे कैवारी- छत्रपती शिवाजी महाराज, Vol-2 June 2006, पु. २